# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

**दुसरा मजला, जून जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400 001**
**मेल : commstateexcise@gmail.com, दूरध्वनी क्रमांक 022 / 22640802**

---

विषय : एफएल-१ घटकांनी परराज्यातून व परदेशातून मद्य आयात करताना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे व मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र विदेशी मद्य ( आयात-निर्यात ) नियमावली १९६३
२) शासन अधिसुचना क्र. बीपीए०८१९/प्र.क्र. १४६/रा.ऊ.शु.-२, दि.१६/०९/२०१९

## परिपत्रक

क्रमांक : एफएलआर ११२०/ऑनलाईन आयात परवाने/सात, मुंबई, दि. 8 जानेवारी, २०२१.

२. महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियमावली १९६३ मधील नियम ४ अन्वये परदेशातून मद्य आयात करण्यासाठी नमुना A मध्ये अर्ज करणेबाबत व नियम ५ अन्वये आयात परवाने (Import Pass) मंजूर करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तर नियम १० अन्वये परराज्यातून भारतीय बनावटीचे विदेशी मद्य आयात करू इच्छिणाऱ्या एफएल-१ घटकांनी नमुना A मध्ये अर्ज करणेबाबत व नियम ११ अन्वये आयात परवाने मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

३. परराज्यातील ज्या मद्य निर्माण्यांना त्यांचे मद्य महाराष्ट्र राज्यात विक्री करावयाचे आहे त्यांना उक्त नियमातील नियम ९ (अ) अन्वये आयुक्त कार्यालय, मुंबई येथे अर्ज करावा लागतो. आवश्यक बाबींची पडताळणी केल्यानंतर व विहित शुल्क भरल्यानंतर नियम ९ (ब) अन्वये त्यांना " नमूना-K" मध्ये नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. सदर नमूना-K नोंदणी प्रमाणपत्र धारकांना नियम ९ (ब) अन्वये आयुक्त कार्यालयात त्यांच्या मद्याच्या ब्रॅण्डची नोंदणी करावी लागते.

ज्या एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांना परराज्यातून मद्य आयात करावयाचे आहे व संबंधित मद्य निर्माण्यांना आयुक्त कार्यालयामार्फत नमुना-K मंजूर केलेला आहे व त्यांचे लेबल / ब्रॅण्ड मंजूर केले आहेत, अशा नमूना-K प्रमाणपत्र धारकांकडूनच मद्य आयात करण्यासाठी अर्ज व सोबत आयात शुल्क भरुन अर्ज करावा लागेल. सध्या जिल्हाधिकारी यांच्या वतीने संबंधित जिल्हयांचे अधीक्षक, राऊशु आयात परवाने मंजूर करतात.

४. शासन अधिसुचना क्र. बीपीए०८१९/प्र.क्र. १४६/रा.ऊ.शु.-२, दि.१६/०९/२०१९ अन्वये जे घटक परदेशातून मद्य आयात करणार आहेत, त्यांनी आयुक्त कार्यालयात नोंदणी करणे व 'नमुना - L' प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर 'नमुना - L' नोंदणी प्रमाणपत्र धारकांना आयुक्त कार्यालयात त्यांच्या मद्याच्या ब्रॅण्डची नोंदणी करावी लागते.

ज्या एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांना परदेशातून मद्य आयात करावयाचे आहे व संबंधित मद्य आयातदाराने आयुक्त कार्यालयामार्फत नमुना-L मंजूर केलेला आहे व त्यांचे लेबल / ब्रॅण्ड मंजूर केले आहेत , अशा नमूना-L प्रमाणपत्र धारकांकडूनच मद्य आयात करण्यासाठी अर्ज व सोबत विशेष शुल्क भरुन अर्ज करावा लागेल. सध्या जिल्हाधिकारी यांच्या वतीने संबंधित जिल्हयांचे अधीक्षक, राऊशु व काही जिल्हयात एफएल-१ घटकाचे प्रभारी अधिकारी आयात परवाने मंजूर करतात.

५. जे एफएल-१ घटक परदेशातून व परराज्यातून मद्य आयात करू इच्छितात त्यांनी यापुढे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संपूर्ण संगणकीकरणाच्या कार्यक्रमान्वये सप्लाय चेन मॅनेजमेंटच्या (SCM) अंतर्गत परदेशातील मद्य आयात करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने मंजूरीबाबत संगणक प्रणाली विकसीत केली आहे. सदर प्रणालीचा साईट अॅड्रेस पुढीलप्रमाणे आहे. https://scmexcise.mahaonline.gov.in/trader/

एफएल-१ घटकांना परदेशातून / परराज्यातून मद्य आयात करण्यासाठी वरील संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांनी या संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन अर्ज कसा करावा व सोबतची कागदपत्रे (उदा. चलन इ.) अपलोड कशी करावीत त्याचप्रमाणे प्रभारी अधिकारी / अधीक्षकांनी आयात परवाने मंजूर करताना कशा पध्दतीने कार्यवाही करावी याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**अ] अर्जदाराने करावयाची कार्यवाही :**

**i) परदेशातून आयात होणाऱ्या मद्याकरीता आयात परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती :-**

१. घटकाकडे Liquor Trader Management या System करीता सध्या त्यांच्या वापरात असलेला लॉगीन आयडी व पासवर्ड ( User Credential ) चा वापर करावा.

२. घटकांनी लॉगीन केल्यानंतर Import Application वर Click करावे. त्यानंतर Import Application for out of India निवडावे.

३. Import Application for out of India मध्ये जाऊन Add New या बटनावर Click करावे.

४. त्यानंतर Import Form मध्ये नमुना 'एल' प्रमाणपत्रधारकाचे नाव निवडावे. तद्नंतर ज्या देशात मद्य तयार झालेले आहे त्या देशाचे नाव निवडावे.

५. त्यानंतर Type मध्ये आयात करावाच्या मद्याचा प्रकार Select करावा. तद्नंतर ब्रॅण्डचे नाव निवडावे व OK बटनवर Click करावे.

६. OK बटनवर Click केल्यानंतर अर्जदारानी निवडलेल्या ब्रॅण्डची तपशिलवार माहिती दिसेल. त्यामध्ये Quantity नमुद केल्यानंतर घटकास सिस्टीमव्दारे परिगणना केलेल्या Manufacturing Cost, Assessable Value, Custom Duty, MRP, Special Fee, Vat, Transport Fee इत्यादीची पडताळणी करावी. यामध्ये घटक अशाप्रकारे एकापेक्षा जास्त ब्रॅण्ड Add करू शकतात. तसेच एखाद्या ब्रॅण्डच्या नावामध्ये बदल करावयाचे असल्यास सदर ब्रॅण्डची माहिती Delete करून नव्याने Add करू शकतात. ऑनलाईन लेबल / ब्रॅण्ड मंजूरीची प्रकिया विकसीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामूळे सध्या सदर ब्रॅण्डची निर्मिती मुल्य, Assessable Value, Custom Duty अर्जदाराला भरावी लागेल.

७. तद्नंतर एफएल-१ घटकाने Add केलेल्या ब्रॅण्डकरीताचे विहीत केलेले विशेष शुल्क व वाहतुक शुल्क शासकीय कोषागरात भरलेल्या चलनाचा जीआरएन नंबर, सीआयएन नंबर व दिनांक याबाबतची माहिती भरावी व Save बटनवर Click करावे.

८. वरीलप्रमाणे माहिती Save केल्यानंतर घटकाने संगणक प्रणालीमधील सुचीमध्ये दिलेली कागदपत्रे Bill of Entry, Purchase Order, Sign Application (Form A) व Challan इत्यादी कागदपत्रे Upload Documents येथे अपलोड करावेत.

९. घटकाने वरीलप्रमाणे आयात परवानाकरीता अर्ज केल्यास त्यास Home Page वर उजव्या बाजूस शेवट / खालचे बटण Import Application Status हे बटन Click केल्यानंतर निवडलेल्या कालावधीतील अर्जाची सद्य:स्थिती दिसेल. तसेच अर्जदार Liquor Trader Management

System च्या Login page वरील Import Application Status या Option मधून त्यांना प्राप्त झालेल्या System Generated Application नंबर टाकून त्यांच्या अर्जाच्या सद्य:स्थितीची माहिती घेवु शकतात.

**ii) परराज्यातून आयात होणाऱ्या मद्याकरीता आयात परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती:-**

घटकाकडे Liquor Trader Management या System करीता असलेला लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करून आयात परवाना करीता वरील संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१. घटकांनी लॉगीन केल्यानंतर Import Application वर Click करावे. त्यानंतर Import Application for out of state निवडावे

२. Import Application for out of state मध्ये जाऊन Add New वर Click करावे.

३. तद्नंतर Manual Import Pass नंबर नमुद करावा. त्यानंतर आयात करणारे मद्य Civilian किंवा CSD करीता आहे, तो योग्य पर्याय निवडावा.

४. त्यानंतर सदरचे मद्य ज्या राज्यातून आयात होणार आहे त्या राज्याचे नाव व पुढे मद्य निर्मात्याचे / नमुना- K प्रमाणपत्रधारकाचे नाव निवडावे.

५. सदरचे मद्य राज्यातील कोणत्या सिमा तपासणी नाक्यावरुन येणार आहे त्या नाक्याचे नाव Select करावे. तसेच ज्या मार्गे मद्य आणले जाणार आहे त्या मार्गावरील मुख्य शहरांची नावे नमूद करावीत.

६. त्यानंतर Type मध्ये मद्याचा प्रकार Select करावा. तद्नंतर ब्रॅण्डचे नाव निवडावे व OK बटनवर Click करावे.

७. OK बटनवर Click केल्यानंतर अर्जदारानी निवडलेल्या ब्रॅण्डची तपशिलवार माहिती दिसेल. त्यामध्ये Quantity नमुद केल्यानंतर घटकास सिस्टीमव्दारे परिगणना केलेल्या Manufacturing Cost, MRP, Import Fee, Vat, Transport Fee इत्यादीची पडताळणी करावी. यामध्ये घटक अशाप्रकारे एकापेक्षा जास्त ब्रॅण्ड Add करू शकतात. तसेच त्यामध्ये एखाद्या ब्रॅण्डच्या नावामध्ये बदल करावयाचे असल्यास सदर ब्रॅण्डची माहिती Delete करून नव्याने Add करू शकतात.

८. तद्नंतर एफएल-१ घटकाने Add केलेल्या ब्रॅण्डकरीताचे विहीत शुल्क शासकीय कोषागरात भरणा केलेल्या चलनाचा जीआरएन नंबर, सीआयएन नंबर व दिनांक याबाबतची माहिती भरावी व Save बटनवर Click करावे.

९. वरीलप्रमाणे माहिती Save केल्यानंतर घटकाने संगणक प्रणालीमधील सुचीमध्ये दिलेली कागदपत्रे Sign Application (Form A), Challan इत्यादी कागदपत्रे अपलोड करावेत.

१०. घटकाने वरीलप्रमाणे आयात परवानाकरीता अर्ज केल्यास त्यास Home Page वर उजव्या बाजूस शेवट / खालचे बटण Import Application Status हे बटन Click केल्यानंतर Search बटन Click केल्यानंतर निवडलेल्या कालावधीतील अर्जाची सद्य:स्थिती दिसेल. तसेच अर्जदार Liquor Trader Management च्या Login page वरील Import Application Status या Option मधून त्यांना प्राप्त झालेल्या System Generated Application नंबर टाकून त्यांच्या अर्जाच्या सद्य:स्थितीची माहिती घेवु शकतात.

११. अधीक्षकांनी आयात परवाना मंजूर केल्याचे सिस्टीममधून समजल्यानंतर एफएल-१ अनुज्ञप्ती धारकांनी Download Signed Document येथून त्यांची प्रिंट काढून घ्यावी व सदर परवान्याचा वापर मद्य आयातीसाठी करावा.

**ब] घटकाचे प्रभारी अधिकारी / अधीक्षक कार्यालयाने करावयाची कार्यवाही :**

१. प्रभारी अधिकारी यांनी Liquor Trader Management मध्ये त्यांना देण्यात आलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून Import Application मध्ये Pending Application येथे जावे व तेथे त्यांच्याकडे प्रलंबित असलेला अर्ज View करावा. तद्नंतर संबंधीत घटकाने अर्जात भरलेली माहिती Application Details व Document Details ची पडताळणी करावी आणि Application Remark Details मध्ये जाऊन त्यांचे अभिप्राय द्यावेत.

२. अधीक्षक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना देण्यात आलेल्या आलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून Import Application मध्ये Pending Application येथे जावे व तेथे त्यांच्याकडे प्रलंबित असलेला अर्ज View करावा. तद्नंतर संबंधीत घटकाने अर्जात भरलेली माहिती Application Details व Document Details ची पडताळणी करावी आणि Application Remark Details मध्ये जाऊन त्यांचे अभिप्राय द्यावेत.

३. अधीक्षकांनी त्यांना देण्यात आलेल्या आलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून Pending Application येथे जाऊन प्रलंबित असलेला अर्ज View करावा. तद्नंतर अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाची व अपलोड केलेल्या कागदपत्राची खातरजमा करावी. तद्नंतर संबंधीताच्या अर्जावर निर्णय घेताना पुढीलपैकी एक अभिप्राय निवडावा. Approved Application, Reject Application व Pending Application . जर निर्णय अमान्य / प्रलंबित असल्यास तर त्याबाबत अधीक्षकांनी अभिप्रायामध्ये थोडक्यात कारण नमुद करावे. तसेच मंजूरीबाबत निर्णय असल्यास आयात परवान्याच्या मुदतीची तारीख Application Details येथे जावून Select करावी.

४. जर मद्य परराज्यातून आयात करण्याकरीता अर्ज असल्यास अधीक्षकांनी / कार्यालय अधीक्षक यांनी राज्याच्या सीमेवरील ज्या सीमा तपासणी नाक्यावरून मद्य आयात केले जाणार आहे, त्याचे नाव अर्जदाराने भरले असले ते मान्य नसल्यास योग्य ते Select करावे.

५. अधीक्षकांनी आयात परवान्यांना मंजूरी दिल्यानंतर कार्यालय अधीक्षक यांनी आयात परवान्याची प्रिंट काढावी व अधीक्षक / उप-अधीक्षक यांची स्वाक्षरी घ्यावी व नंतर तो आयात परवाना सिस्टिमवर अपलोड करावा.

नियमातील तरतुदीनुसार परदेशातून / परराज्यातून आयात करावयाच्या मद्याचे आयात परवाने मंजूर करण्यास जिल्हाधिकारी हे सक्षम अधिकारी आहेत. जिल्हाधिकारी यांच्या वतीने अधीक्षक, राऊशु हे आयात परवाने मंजूर करीत असतात. परंतु काही जिल्हयामध्ये परदेशातून आयात करावयाच्या मद्याचे आयात परवाने घटकाचे प्रभारी अधिकारी मंजूर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापुढे परदेशातून मद्य आयात करावयाचे असल्यास सदर आयात परवाने मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्यावतीने संबंधीत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क हे वापरतील. यापुढे अशा प्रकारचे आयात परवाने अधीक्षक, राऊशु यांनी ऑनलाईन पध्दतीने मंजूर करावयाचे आहेत.

ऑनलाईन पध्दीतीने परवाने मंजूर करीत असतांना आयातदार घटकांना उध्दभवणाऱ्या समस्याचे निराकरण अधीक्षक व घटकाच्या प्रभारी अधिकारी यांनी करावे. अधीक्षकांनी सदर प्रणालीचा अभ्यास करावा व त्याबाबतचे प्रशिक्षण घटकाचे प्रभारी अधिकारी व अनुज्ञप्तीधारक यांना द्यावे. सेवा हमी कायद्यांतर्गत आयात परवाने अर्ज प्राप्त झाल्यानंतर १२ तासाच्या आत मंजूर करावयाची तरतुद आहे. त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने आयात परवान्याकरीता अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहीत वेळेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता अधीक्षक, राऊशु यांनी घ्यावी.

त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने आयात परवान्याकरीता अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहीत वेळेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता अधीक्षक, राऊशु यांनी घ्यावी.

अधीक्षकांनी आयात परवाना मंजूर केल्यानंतर एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांनी Download Signed Document येथून त्याची प्रिंट काढून घ्यावी व प्रभारी अधिकाऱ्याकडून त्यावर राऊंड सिलचा शिक्का उठवून घ्यावा अथवा प्रभारी अधिकाऱ्याची प्रति स्वाक्षरी घ्यावी. ज्यावेळी आयात परवाने डिजीटल सहीद्वारे निर्गमित होतील त्यावेळी उक्त शिक्का अथवा प्रभारी अधिकाऱ्याची प्रति स्वाक्षरी आयात परवान्यावर घेण्याची आवश्यकता राहणार नाही. सदर आयात परवान्याचा वापर मद्य आयातीसाठी करावा. उक्त आयात परवान्याचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यावर एफएल-१ घटक व संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येईल, यांची त्यांनी नोंद घ्यावी.

जर या प्रणालीवर ऑनलाईन अर्ज आले तर अधीक्षकांनी ते ऑनलाईन पध्दतीनेच मंजूर करावेत. ऑनलाईन पध्दती विकसित करण्यात आलेली असल्यामुळे आयात परवाने मॅन्युल पध्दतीने यापुढे दि. ०१/०२/२०२१ नंतर मंजूर करण्यात येवू नयेत. ऑनलाईन पध्दतीमध्ये काही समस्या निर्माण झाल्यास विभागीय उपआयुक्तांच्या लेखी / मौखिक पुर्व परवानगीने अधीक्षकांनी तात्पुरत्या स्वरुपात आयात परवाने मंजूर करावेत व त्याची नोंद संगणक प्रणालीवर तात्काळ घ्यावी.

सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील एफएल-१ अनुज्ञप्तीधारकास व त्यावरील प्रभारी अधिकारी, राऊशु, यांच्या निदर्शनास आणुन द्यावे व त्यांच्या कार्यक्षेत्रात ऑनलाईन कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविण्याची दक्षता घ्यावी.

या परिपत्रकाची सर्व अधीक्षकांनी पोहोच द्यावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व एफएल-१ घटकावरील प्रभारी अधिकारी, राऊशु.
४. सर्व एफएल-१ अनुज्ञप्तीधारक.

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

१. मा. प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सविनय सादर
२. मा. मंत्री महोदय, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव
३. मा. राज्य मंत्री महोदय, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव

प्रतिलिपी

१. आयुक्त कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
२. अभिलेख शाखा